# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २०.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १९/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ३५,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१९/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन औंढा ना०२,हटटा ०१,कळमनुरी ०१ असे एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २२.६८ लिटर दारू असा एकुण १२,१५०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१९/०८/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली ग्रा.०२,आ.बाळापुर येथे ०१असे एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण १०,६४०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :—दिनांक १९/०८/२०२२ रोजी फिर्यादी संजय लक्ष्मण मार्के व्य.नौकरी पोहेकॉ ब नं ५९ ने पोस्टे हिंगोली शहर यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३७९,३४, भादवी व कलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधि. प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१८. ०८.२०२२ रोजी २३.३० वा सु हिंगोली ते नांदेड जाणारे रोडवर बिरसा मुंडा चौक येथे यातील आरोपी क्र ०१ यांनी आरोपी क्र ०२ यांचे सांगणे वरून हायवा ट्रक क्र एमएच २८ बिएम ७७७८ मध्ये वाळु वाहतुकीचा परवाना नसतांना पाच ब्रास वाळु अंदाजे ३०,००० रू च्या वाळुची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक १९/०८/२०२२ रोजी फिर्यादी रमिष पि.मनोहर नालुपुरकल वय ३१ व्य.खाजगी नौकरी टिमथाय अधीन रोडवेज गडचांदुरा ता कोरपना जि चंद्रपुर यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ. बाळापुर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१४.०८.२०२२ रोजी ९.३० वा ते दिनांक १९.०८.२०२२ रोजीचे ११.०० वा च्या दरम्यान केव्हातरी वेळ नक्की नाही पंजाबी ढाबा समोर हदगाव रोड वारंगा फाटा येथे आरोपी याने फिर्यादीचे टिमथाम अधीन रोडवेज कंपनी गडचांदुर या कंपनीच्या ट्रक क्र एपी २६ टि डी ९९३१ या २२ टायरच्या ट्रक चे ८ टायर व ८ डिस्क असा एकुण १,७६,००० रू चा मुदेमाल चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.